जनार्थ आदिवासी विकास संस्था

# लोकजागर

अंक – ८ । मार्च २०१४

## स्त्री प्रजनन संस्थेचे आजार

२

### बाईच्या आरोग्याचे हे प्रश्नही समजून घेतले पाहिजेत! (भाग २)

स्त्रियांचे आरोग्य म्हटल्यावर फक्त गरोदरपणात आणि बाळंतपणात काळजी घेण्याची आवश्यकता आहे असा समज आहे. शासनसुद्धा 'स्त्रियांचे आरोग्य' असा स्वतंत्र विचार न करता प्रजनन (महिला म्हणजे केवळ प्रजनन!) व बाल आरोग्य (आर.सी.एच.) असा संयुक्त विचार करताना दिसते. बाईचे गरोदरपण, बाळंतपण याचा सरळ संबंध मातामृत्यु व बालमृत्यु यांच्याशी असल्याने आरोग्य सेवांचा सर्व भर स्त्रियांच्या याच अवस्थांवर बहुतांशपणे दिलेला आहे असे दिसते.

पण या अवस्थेच्या अलिकडे आणि पलिकडेही स्त्रियांच्या आरोग्याचे प्रश्न आहेत. मात्र त्यांच्याकडे समाजही फारसे लक्ष देत नाही आणि शासनही दखल घेत नाही. आरोग्याच्या छोट्यामोठ्या समस्यांबाबत मोकळेपणी कोणाशी बोलण्याची किंवा माहिती मिळण्याची जागाही उपलब्ध नसल्याने, बऱ्याच बाया हे नैसर्गिकच असेल असे मानून मुकाट सहन करत जगतात.

प्रजनन मार्गात जंतुसंसर्ग, कुपोषणाचा प्रभाव, यापासून ते कॅन्सर सारख्या गंभीर आजारांची माहिती मिळणे, त्यावरही औषधोपचार मिळण्यासाठी तरतूद होणे, याबद्दल बोलायला वाटणारा संकोच दूर करणारे वातावरण समाजात तयार होणे या सर्वच गोष्टींसाठी प्रयत्न व्हायला हवेत.

लोकजागरच्या या तीन अंकांमध्ये या संदर्भात माहिती देण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. आपल्या घरातल्या, गावातल्या बायांपर्यंत ही माहिती पोचवायला गाव आरोग्य समितीने, तसेच इतर गावकऱ्यांनी सहकार्य करावे असे नम्र आवाहन.

| | |
|---|---|
| अंगावरुन पांढरे जाणे | ०३ |
| अंगावरुन लाल जाणे | ०५ |
| गर्भाशयाचा कॅन्सर | ०७ |

शेतीची कामे सुरु झाली होती. मजुरीने सगळ्या बाया कामाला जात होत्या. आज एकाच्या शेतावर बाया खुरपणीचं काम मजुरीने करायला गेल्या होत्या. काम करता करता त्याच्यामध्ये बोलायला सुरवात झाली. आज रमा नेहमी पेक्षा शांत होती. त्यामुळे सुधाने तिला विचारले, का ग बाई आज एकदम शांत बसली आहेस? आज काय सकाळी सकाळी नवऱ्याबरोबर काही वाजलं की काय? रमाने बोलायला सुरवात केली.

रमा: मागच्या काही दिवसांपासून अंगावरून पांढरं जायला लागलय. मला वाटल पाळी यायच्या आधी येत तसं असेल, पण सारखंच अंगावरून जातंय. आता खाली खाजवायला लागलंय. मला हे कोणाला सांगायची पण लाज वाटते. मला असं झालंय तर माझा नवरा म्हणायला लागलाय की माझं अजून कुणाबरोबर तरी लफड चाललं आहे. आता तुम्हीच सांगा मी काय करावं, एकतर आपल्याला असं काही होतंय हे बोलता येत नाही आणि नवऱ्याला काय सांगून पटवून देऊ मी. काहीच कळत नाहीये.

सकू: अग आपल्या गावात नर्सबाई येतात त्यांना विचारून बघ. माझ्या सुनेच्या अंगावरून लाल जायचं. आता आपल्या बायांना महिन्याच्या महिन्याला पाळी येतेच. पण तिला त्यानंतरही जायचं. पार सुकून गेली होती या त्रासाने ती. काही काम करायला जोर नसायचा. मग गावातल्या नर्स बाईला तिने सांगितल्यावर तिला दवाखान्यात जायला सांगितलं होत त्यांनी. मग थोड्या दिवसांनी सगळा त्रास कमी झाला बघ. त्यामुळे तू पण नक्की नर्सबाई बरोबर बोलून घे. नाहीतर तुझी आणि नवऱ्याची भांडण अजून व्हायची.

रमा लगेचच दुसऱ्या दिवशी नर्स बाईंना भेटली. नर्सबाईने तिला तात्पुरती औषधे दिली. आणि नवऱ्याला घेऊन डॉक्टरांकडे जायला सांगितले.



**रमाला आलेला अनुभव हा आपल्यापैकी अनेक जणींना आला देखील असेल. या त्रासाकडे दुर्लक्ष करून आणि परिस्थितीमुळे आजार अंगावर काढण्याची सवय आपल्याला असते. या आपल्या सवयीमुळे आरोग्यावर वाईट परिणाम होतात. म्हणून असं काही का होतं आणि त्यावर उपचार वेळेवर केले नाहीत तर काय होतं हे समजून घेतले पाहिजे.**

# अंगावरुन पांढरे जाणे

## बुरशीमुळे अंगावरुन पांढरे पाणी जाणे

**हा आजार एक प्रकारच्या बुरशीमुळे होतो. अस्वच्छतेमुळे अंगावरुन पांढरे जाण्याचा त्रास होतो.**



**या आजारात खालील लक्षणे दिसून येतात–**

- मायांग व योनीला खूप खाज येते.
- पांढरे चिकट दह्यासारखे आंबट वास येणारे पाणी अंगावरुन जाते.
- नेहमीपेक्षा योनीस्त्रावाचे प्रमाण जास्त असते.
- योनीच्या आजूबाजूचा भाग लालसर होतो.
- लघवीला जळजळ होते.
- पुरुषाशी संबंधाच्या वेळी त्रास होतो व दुखतं.

बुरशीमुळे होणारा हा आजार वयस्कर स्त्रियांना झाल्यास मधुमेहाची शक्यता असते. म्हणून त्यांनी रक्त व लघवी तपासून घेतली पाहिजे.

## योनीत जंतुलागण होऊ नये म्हणजेच हा आजार होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी-

- मासिक पाळीत किंवा पांढरे पाणी अंगावर जात असेल किंवा बाळंतपण झाले असेल तर बायांना स्वच्छ आंघोळ करायची विशेष गरज असते. त्यामुळे आंघोळ करताना मायांगाची स्वच्छता करता यावी अशी जागा असायला हवी. त्यासाठी बंद न्हाणीघराची सोय असायला पाहिजे.
- मासिक पाळीच्या वेळेस स्वच्छ कपडे वापरावे. पाळीच्या वेळी घेत असलेले कपडे स्वच्छ धुऊन उन्हात वाळत घालावेत. घरातील प्रत्येक बाईने वेगळे कपडे असावेत. पाळीचे कपडे व्यवस्थित ठेवावेत.
- शौचानंतर धुण्याची प्रक्रिया पुढून मागच्या बाजूला असावी.
- आतील कपडे सुती वापरावेत व रोजच्या रोज धुऊन वापरावेत.
- संतुलित आहार घ्यावा.
- बाळंतपण व गर्भपात करताना स्वच्छता असावी. शक्य झाल्यास बाळंतपण व गर्भपात आरोग्य केंद्रात करावे.

# परजीवी जंतुंमुळे पांढरे पाणी जाणे



**हा आजार कशामुळे होतो ?**

हा आजार जंतुंमुळे होतो. हे जंतु पुरुषाच्या लघवीच्या पिशवीत असतात. बहुतेक वेळा पुरुषाला त्रास नसतो. पण स्त्री–पुरुष संबंधातून स्त्रिला या आजाराची लागण होते. तिला मात्र खूपच त्रास होतो.

**या आजारात बायांमध्ये खालील लक्षणे दिसून येतात–**

* पिवळट, हिरवट साबणाच्या फेसासारखे पाणी जाते.
* या पाण्याला खराब वास येतो.
* पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने ओलं ओलं वाटतं.
* योनीमार्गात खूप खाज व सूज येते.
* ओटीपोट व कंबर दुखते.
* लघवी करताना जळजळ होते.

**या आजारात घ्यायची काळजी :**

या आजारात पती–पत्नी दोघांनीही इलाज करणे आवश्यक आहे. फक्त स्त्रीचा इलाज केला तर पुरुषाकडून परत तिला जंतुसंसर्ग होऊ शकतो. जर एकाचवेळी उपचार घेणे शक्य नसेल तर दोघांचाही पूर्ण इलाज होईपर्यंत संबंध टाळावा किंवा संबंध ठेवताना निरोध वापरावा. पण दोघांनीही उपचार घेणे गरजेचे आहे.

**गर्भाशयाचा कॅन्सर, गनोरिया (गरमी), ओटीपोटात दाह, किंवा अंग बाहेर येणे या आजारांमध्ये पण अंगावरून पांढरे पाणी जाणे असा त्रास होऊ शकतो त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष न करता लगेच उपचार घेतले पाहिजेत.**

## अंगावरुन पांढरे जाणे या आजारावर उपचार न घेतल्यास होणारे गंभीर परिणाम:

* गर्भपिशवीपर्यंत जंतुलागण पसरते.
* वंध्यत्व येऊ शकते (मूल न होणे)
* खूप काळ उपचार न घेतल्यास गर्भाशयाच्या तोंडाचा कॅन्सर होऊ शकतो.
* असुरक्षित संबंधांमुळे एच.आय.व्ही. होण्याची शक्यता वाढते.
* गंभीर परिस्थितीमध्ये मृत्यूची शक्यता असते.

## गरोदरपणात बाईला जर अशी जंतू लागण झाली तर जन्माला येणाऱ्या बाळावर होणारा परिणाम :

* अपुऱ्या दिवसांचे बाळंतपण.
* कमी वजनाचे बाळ.
* गर्भपात किंवा मृत बाळाचा जन्म.
* जन्मतःच बाळाला आजार असणे.
* नवजात बाळाला जंतुलागणीमुळे न्यूमोनिया होणे.
* बाळंतपणाच्यावेळी नवजात बाळाला डोळ्यांमध्ये जंतुलागण झाल्यामुळे ते आंधळे होण्याची शक्यता असते.

## महत्वाचे

स्त्रियांना सर्वसाधारणपणे नैसर्गिकरित्याही अंगावरून पांढरे पाणी जात असते. मात्र अशा वेळी खाज येत नाही किंवा घाण वास येत नाही.

**अंगावरून नैसर्गिकरित्या पांढरे पाणी जाण्याचा काळ**

* मासिक पाळी येण्याच्या तीन–चार दिवस आधी
* स्त्री–बीज परिपक्व होण्याच्या काळात (पाळी येण्याच्या १४ दिवस आधी)
* गरोदर असताना
* लैंगिक संबंधाच्या वेळेस.

पण जर खराब, वास येणारे अंगावर जात असेल किंवा खाजणे इत्यादी त्रास होत असेल तरच तो आजार समजावा.







## *अंगावरून लाल जाणे*



**अंगावरून लाल जात असेल तर खालील लक्षणे दिसून येतात–**

* अंगावरून सतत व खूप लाल जाणे.
* कंबर व ओटीपोटात दुखणे.
* हातापायात जीव नसल्यासारखे वाटणे.
* अशक्तपणा वाटणे.

**अंगावरून लाल जाण्यामागे पुढील कारणे असतात–**

* शरीरातील हार्मोन्सचा समतोल बिघडणे.
* गर्भाशयाच्या पिशवीला गाठ येणे.
* गर्भाशयाचा किंवा गर्भाशयाच्या तोंडाचा कॅन्सर होणे.
* तांबी बसवल्यामुळे कधी कधी अंगावरून लाल जाणे.
* गर्भपातामुळेही कधी कधी रक्तस्त्राव होऊ शकतो.
* गर्भपात किंवा बाळंतपणानंतर गर्भाशयाच्या जंतुसंसर्गामुळे अंगावरून लाल जाऊ शकते.

## महत्वाचे

मासिक पाळी तीन आठवड्यांपेक्षा लवकर येत असेल, पाळी चालू नसतानाही मध्येच अचानक अंगावर लाल जात असेल किंवा पाळी बंद झाल्यानंतर अंगावर लाल जात असेल तर काहीतरी गंभीर आजार झाला आहे असे समजावे आणि लवकरात लवकर तपासणी व उपचारासाठी दवाखान्यात जावे.

अंगावरून लाल जात असताना जर लवकर उपचार केला नाहीतर सततच्या रक्तस्त्रावाने अतिशय अशक्तपणा येऊ शकतो. कधीकधी गर्भाशय काढून टाकावे लागते. जर कॅन्सरमुळे रक्तस्त्राव होत असेल तर कॅन्सर शरीराच्या इतर भागात पसरू शकतो. त्यामुळे मृत्यूही होऊ शकतो. म्हणून अंगावरून लाल जाण्याचा त्रास सहन न करता लवकरात लवकर डॉक्टरकडे जाऊन आजाराचे निदान करून उपचार सुरु करावेत.



यमुना बाईचे वय आता ४४ च्या वर गेले होते. आपल्याकडे अजूनही मुलीचे लग्न लहान वयात केले जाते तसंच यमुना बाईचे लग्नही वयाच्या १५ व्या वर्षातच झाले होते. लग्नानंतर २ वर्षांनी मुल झाले. तिला अशी एकुण ३ मुले आहेत. मुलांची लग्न होऊन त्यांना मुले झाली आहेत. मुले आपापल्या संसाराला लागल्यामुळे ती आनंदात होती. यमुनाबाईला साखरेचा आजार आहे. आता कष्ट करून पोटापुरते आणि आपल्या आजारासाठी पैसे कमवायचे आणि नवऱ्यासोबत आनंदात राहायचं असं तिने ठरवलं होतं.

पाळीच्या वेळी यमुना बाईच्या अंगावरून खूप जास्त जात होते. पाळी पण आधीसारखी नियमित महिन्याच्या महिन्याला येत नव्हती. आपल्याला नातवंड आली तर आता आपलं पाळी जाण्याच वय झाल आहे असा विचार करून तिने त्याकडे अजिबात लक्ष दिल नाही. पुढच्या दोन वर्षांनी तिची पाळी थांबली. पण त्यानंतर चार पाच महिन्यांनी परत अंगावरून रक्त जायला लागलं. म्हणून त्यांनी दवाखान्यात जायचं ठरवलं. शहाद्याच्या दवाखान्यात गेल्यावर लक्षात आले की यमुनाबाईला 'गर्भाशयाचा कॅन्सर' झाला आहे. तसेच कॅन्सर गर्भाशयापासून सुरू झाला असला तरी इतर ठिकाण पण पसरला होता. डॉक्टर म्हणाले, 'खूप उशीर झाला आहे. प्रयत्न केला तरी गॅरंटी देता येणार नाही.' पुढच्या ३ महिन्यातच यमुनाबाईचा मृत्यू झाला.




## गर्भाशयाचा कॅन्सर

गर्भाशयाच्या कॅन्सरची सुरुवात बरेचदा त्याच्या अस्तरापासून होते. हा कॅन्सर वेळेवर लक्षात येऊन उपचार केले नाहीत तर तो गर्भाशयात व शरीराच्या इतर भागातही पसरतो.




**गर्भाशयाच्या कॅन्सरची लक्षणे काय आहेत?**

* पाळीत खूप अंगावरून जाणे.
* अनियमित पाळी किंवा वेळी–अवेळी अंगावरून जाणे.
* पाळी थांबल्यानंतर अंगावरून जाणे.

**गर्भाशयाचा कॅन्सर होण्याचा धोका कधी जास्त असतो?**

* ४० वर्षे वयाच्या पुढील स्त्रियांना होतो. बरेचदा पाळी थांबल्यानंतर होतो.
* ज्यांचे वजन जास्त आहे अशा स्त्रियांना जास्त प्रमाणात होतो.
* मधुमेह असलेल्या स्त्रिया

## गर्भाशयाचा कॅन्सर होऊ नये म्हणून काय काळजी घेतली पाहिजे?

* पाळी बंद झाल्यानंतर थोडेसे जरी अंगावर गेले किंवा डाग जरी पडला तरी कॅन्सरसाठीची तपासणी लगेच केली पाहिजे.
* ४० वर्षानंतर अनियमित रक्तस्त्राव झाल्यास कॅन्सरसाठीची तपासणी लगेच केली पाहिजे. गर्भाशयाच्या कॅन्सरचे निदान लवकर झाले तर तो शस्त्रक्रियेने बरा होऊ शकतो. कधी–कधी केमोथेरपी किंवा रेडिएशनथेरपीची गरज लागू शकते.




## आपण काय करु शकतो...

* **नैसर्गिक अंगावरून जाणे आणि त्यापेक्षा जास्त जाणे यातला फरक ओळखणे.**
* **अंगावरून पांढर पाणी जाणं किंवा लाल जाणं हा त्रास कधीही अंगावर न काढू नये.**
* **त्रास होत असल्यास या आजारांवर डॉक्टर कडून त्याचा इलाज करून घेणे.**
* **आपल्या माहितीत अशी कोणीही बाई जिला असा त्रास होत असेल तर तिला दवाखान्यात जाण्यासाठी मदत करणे किंवा त्याची माहिती देणे.**

संदर्भ पुस्तिका: स्त्री प्रजनन संस्थेचे आजार व घ्यावयाची काळजी – जनार्थ व साथी, स्त्रियांसाठी डॉक्टर नसेल तेथे – स्त्रीहितकारिणी, संकेतस्थळे

जनार्थ आदिवासी विकास संस्था
प्लॉट नं. ८, रमागिरी, विजयनगर, शहादा–४२५४०९, जि.–नंदुरबार
☎ ०२५६५–२२३१६५/ २२५४९५ ईमेल : janarthorg@rediffmail.com